त्रिपक्षीय करारनामा करुन अवनत वनक्षेत्राचे पुनर्वनीकरण करण्यासाठी खाजगी व अशासकीय संस्थांचा सहभाग घेण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः एफएलडी-२०१७/प्र.क्र.२२१/फ-१०**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १२/१०/२०१७

**प्रस्तावना -**

अवनत वन क्षेत्राचे पुनर्वनीकरण करण्यासाठी खाजगी व अशासकीय संस्थांचा सहभाग घेण्याबाबत त्रिपक्षीय करारनामा करुन वनीकरण हाती घेण्याच्या धोरणास शासनाने दिनांक २३/०९/२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. सदर प्रकरणी निर्णय घेण्याकरीता शासन निर्णय, दिनांक ०७/०३/२०१५ अन्वये गठीत उच्चाधिकार समितीपुढे मे.जिंदाल स्टील लिमिटेड, डोलवी यांनी सादर केलेला २६.०० हेक्टर अवनत क्षेत्रावर वनीकरण करण्याचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य सचिव, उच्चाधिकार समिती यांनी सादर केला होता. उच्चाधिकार समितीच्या दिनांक २८/०९/२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये या प्रस्तावाबाबत चर्चा होऊन समितीने सदर प्रस्तावास मान्यता देण्याची शिफारस केली आहे.

**शासन आदेश-**

उच्चाधिकार समितीने केलेल्या शिफारशीचा साकल्याने विचार करुन, शासन आता असे आदेश देत आहे की, मे.जिंदाल स्टील लिमिटेड, डोलवी यांनी सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक ०६/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार खाली नमूद केलेल्या अवनत वनक्षेत्र असलेल्या ठिकाणी मे.जिंदाल स्टील लिमिटेड, डोलवी ही औद्योगिक संस्था, टेरे पॉलिसी सेंटर, पुणे ही अशासकीय संस्था व उपवनसंरक्षक, अलिबाग वन विभाग यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करुन एकूण २६.०० हेक्टर क्षेत्रावर वृक्ष लागवड करण्याचा प्रकल्प राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| गाव | सर्व्हे नंबर | वैधानिक दर्जा | एकूण क्षेत्र (हेक्टर) | लागवडीयोग्य क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| मौजे काराव, ता.पेण, जि.रायगड | २३६/२ | -- | ११.५३५ | ०६.०० |
| मौजे डोलवी, ता.पेण, जि.रायगड | ४३ /अ १ | संरक्षित वन | ७४.३३ | २०.०० |
| **एकूण क्षेत्र** | | | | **२६.०० हेक्टर** |

२. सदर प्रकल्पास दिलेली मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) वरील क्षेत्रात वृक्ष लागवड करणे, जलमृदसंधारण करणे, ७ वर्षापर्यंत त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे काम मे.जिंदाल स्टील लिमिटेड, डोलवी यांचे अर्थसहाय्याने टेरे पॉलिसी सेंटर, पुणे यांनी करावे.

२) प्रकल्पासाठी व त्याच्या व्यवस्थापनासाठी येणारा सर्व खर्च मे.जिंदाल स्टील लिमिटेड, डोलवी करेल.

३) प्रकल्पांतर्गत करण्यात येणारी वृक्ष लागवड ही वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षणाखाली करण्यात यावी. वन विभागामार्फत राज्यात ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने पुढील वर्षी आयोजित करण्यात येणा-या वृक्ष लागवड सप्ताहात वृक्ष लागवड पूर्ण करण्यात यावी.

४) प्रकल्पासाठी शासन पत्र क्र.एफएलडी-१०१२/प्र.क्र.२०३/फ-१०, दिनांक ८/१/२०१३ अन्वये विहित केलेल्या त्रिपक्षीय करारनाम्याच्या मसुद्याप्रमाणे मे.जिंदाल स्टील लिमिटेड, डोलवी ही औद्योगिक संस्था, टेरे पॉलिसी सेंटर, पुणे ही अशासकीय संस्था व उपवनसंरक्षक, अलिबाग, वन विभाग यांच्यामध्ये त्रिपक्षीय करारनामा करण्यात यावा. वन विभागाच्यावतीने त्रिपक्षीय करारनाम्यावर स्वाक्षरी करण्यासाठी उपवनसंरक्षक, अलिबाग यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले वन विभागाचे कोणतेही अधिकारी यांना प्रकल्प स्थळी भेट देवून प्रकल्पाचे निरीक्षण करण्याचा व त्याबाबत सुधारणा / सूचना करण्याचा अधिकार राहील.

६) त्रिपक्षीय करारनाम्यातील कोणत्याही अटीचे मे.जिंदाल स्टील लिमिटेड, डोलवी ही औद्योगिक संस्था व टेरे पॉलिसी सेंटर, पुणे ही अशासकीय संस्था यांच्याकडून भंग झाल्यास त्रिपक्षीय करारनामा तात्काळ समाप्त करण्याचा अथवा इतर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्याचा अधिकार प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना असेल.

३. वरील ठिकाणी वृक्ष लागवड करताना, ती केल्यानंतरच्या ७ वर्षाच्या कालावधीत आणि भविष्यात कधीही या वनक्षेत्रावर मे.जिंदाल स्टील लिमिटेड, डोलवी ही औद्योगिक संस्था व टेरे पॉलिसी सेंटर, पुणे ही अशासकीय संस्था यांना कोणताही कायदेशीर व मालकी हक्क प्राप्त होणार नाही आणि त्याबद्दल त्यांना कोणत्याही न्यायालयात वा प्राधिकरणापुढे कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना आवश्यक वाटतील अशा इतर अटी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७१०१२१२४१३२५११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrashekhar D Tarange

Digitally signed by Chandrashekhar D Tarange
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fb8c9383a2159ef0954b8bea7a4de7769b9a2308eccebd89cbd1dd3f1964f665, cn=Chandrashekhar D Tarange
Date: 2017.10.12 12:31:15 +05'30'

**( चंद्रशेखर तरंगे )**
**अवर सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत:-**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
३) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे
४) उप वनसंरक्षक, अलिबाग
५) मे.जे.एस.डब्ल्यू.स्टील लिमिटेड, मौजे-डोलवी, ता.पेण, जि.रायगड-४०२ १०७.
६) टेरे पॉलिसी सेंटर, ३०६, मल्टीकॉन स्क्वेअर, मनोहर मंगल कार्यालयाच्या पुढे, एरंडवणे, पुणे-४११ ००४.
७) निवडनस्ती (फ-१० कार्यासन)